दिनांक २३/०२/२०२२

# लाच मागणी सापळाकेस

**आलोसे नवनाथ पांडुरंग लोखंडे वय ३५ वर्ष व्यवसाय पोलीस नाईक/१२४० नेमणुक पोलीस स्टेशन गंगाखेड रा.सरगम कॉलनी वांगी रोड परभणी (वर्ग–३) यांनी ८०,०००/– रू लाच मागणी केल्याचे यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तक्रारदार यांनी फोनकरून पोलीस उप अधिक्षक किरण बिडवे ला.प्र.वि. परभणी यांना फोन करून तक्रार असलेबाबत दि. १७/०२/२०२२ रोजी कळविल्यावरून सापळा पथक महातपुरी फाटा येथे आले तेथे तक्रारदार यांनी तक्रार दिली की,नमुद आलोसे हे तक्रारदार यांना त्यांचे जेसीबीवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारदार यांचे भावास अटक न करण्यासाठी १,००,०००/– रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १७.०२.२०२२ रोजी तक्रारदार यांना नमुद आलोसे नवनाथ पांडुरंग लोखंडे वय ३५ वर्ष व्यवसाय पोलीस नाईक/१२४० नेमणुक पोलीस स्टेशन गंगाखेड रा.सरगम कॉलनी वांगी रोड परभणी (वर्ग–३), यांनी जेसीबीवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारदार यांचे भावास अटक न करण्यासाठी १,००,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ८०,०००/ – रूपये स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. परंतु नमुद आलोसे यांनी दि. १७/०२/२०२२ रोजी संशय आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही.

दि.१७/०२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये नमुद आलोसे नवनाथ पांडुरंग लोखंडे वय ३५ वर्ष व्यवसाय पोलीस नाईक/१२४० नेमणुक पोलीस स्टेशन गंगाखेड रा.सरगम कॉलनी वांगी रोड परभणी (वर्ग–३) यांनी तक्रारदार याना लाच मागणी केल्याचे निष्पन्न झालेने त्यांचे विरूध्द पो.स्टे. गंगाखेड येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक राहुल खाडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.किरण बिडवे, पोह/चंद्रशेखर निलपत्रेवार, पोना/अनिल कटारे, पोना/सचिन धबडगे ,पोशि/माणिक चटटे, पोना/कुलकर्णी, चापोना/जनार्धन कदम पोह/हनुमंते पोह/बाग पोना/शेख मुखीद, पोशि/मुक्तार, मपोशि/दंडवते चालक सपोउपनि/हबीब ए.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचार विरूध्द करण्यात येणाऱ्या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचे कडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्री.राहुल खाडे पोलीस अधिक्षक,ला. प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड – मो. ८८८८८०७२९९

श्री. धरमसिंग चव्हाण अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र,नांदेड– मो.९९२३४१७०७६

श्री.किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र.वि.परभणी – मो. ७०२०२२४६३१

श्री. स्वपाली धुतराज, पोलीस निरीक्षक, ला. प्र.वि.परभणी – मो. ९५०३०६९३३९

Scanned with CamScanner